# <u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८.</u>

## <u>जाहिर निवेदन</u>

## ("आया" पदासाठी भरती बाबत)

या निवेदनाद्वारे कळविण्यात येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील "आया" अभिनामाची ३३ रिक्त पदे भरण्यासाठी दि. १२/०४/२०१२ च्या वर्तमान पत्रातील जाहिरातीनुसार व सेवायोजन कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अर्जानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी स्पर्धा परिक्षा रविवार दि. १५/०९/२०१३ रोजी श्री. म्हाळसाकांत विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, आकुर्डी, पुणे. येथे सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आली असून, पात्र उमेदवारांना परीक्षेस उपस्थित राहण्याबाबतची पत्रे पोस्टाने पाठविण्यात आली आहेत. पात्र उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी वेळेवर उपस्थित रहावे.

"आया" पदाच्या परीक्षेची गुणविभागणी लेखी परीक्षेस - ९० गुण व मुलाखतीस १० गुण अशी राहील.

लेखी परीक्षेसाठीच्या ९० गुणापैंकी मराठी - ३० गुण, गणित - १० गुण, सामान्यज्ञान - ३० गुण व आया पदाच्या कामकाजाशी संबंधित प्रश्नासाठी - २० गुण अशी गुण विभागणी राहील.

"आया" पदासाठी पात्र व अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी सोबत प्रसिध्द केली आहे. लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांची तपासणी OMR मशीनद्वारे करण्यात येणार आहे. OMR उत्तरपत्रिकेचा नमुना सोबत प्रसिध्द केला आहे.

०४/०९/२०१३

सहाय्यक आयुक्त, प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.